# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

ग्रामीण कृ ष मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र वभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महा वद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : **amfupune@gmail.com**


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला स मतीची साप्ताहिक बैठक दि. ११/१०/२०२४

## जिल्हा :पुणे

<u>मागील आठवडयाचे हवामान :</u>

मागील आठवडयाचे हवामान : पुणे परिसरात मागील आठवडयात कमाल तापमान ३१.४ ते ३३.० अंश सेल्सिअस तर कमान तापमान २०.३ ते २२.९ अंश सेल्सिअसच्या दरम्यान होते. सकाळची सापेक्ष आर्द्रता ८४ ते ९३ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ४५ ते ५९ टक्के होती. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी २.१ ते ५.२ क.मी. होता.

हवामान अंदाज : पुढील पाच दिवसात पुणे जिल्ह्यात कमाल तापमान ३१ ते ३२ अंश सेल्सिअस, तर कमान तापमान २२ ते २४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील. सकाळची सापेक्ष आर्द्रता ७३ टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ६३ टक्के दरम्यान राहील. वाऱ्याचा सरासरी वेग ताशी ०७ ते १० क.मी. दरम्यान राहील. आकाश ढगाळ ते पूर्णतः ढगाळ राहील. वा-याची दिशा आग्नेयेकडून वायव्येकडे राहील.

| मागील आठवड्यातील हवामान (०५/१०/२०२४ ते ११/१०/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (११/१०/२०२४ ते १५/१०/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | दिनांक | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 1.9 | 0.0 | पाऊस ( ममी) | 35 | 20 | 15 | 18 | 20 |
| 31.7 | 32.5 | 32.5 | 33.0 | 32.3 | 31.6 | 31.4 | कमाल तापमान(अं.से.) | 32 | 32 | 31 | 32 | 31 |
| 20.3 | 21.4 | 21.6 | 21.4 | 22.9 | 21.8 | 22.9 | कमान तापमान(अं.से.) | 23 | 22 | 24 | 22 | 23 |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | 8 | 8 | 7 | 6 | 7 |
| 92 | 93 | 89 | 90 | 84 | 92 | 87 | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 72 | 72 | 73 | 74 | 73 |
| 45 | 56 | 47 | 49 | 56 | 59 | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 64 | 61 | 62 | 64 | 64 |
| 4.5 | 2.5 | 3.2 | 3.8 | 2.1 | 2.3 | 5.2 | वाऱ्याचा वेग ( कमी/तास) | 9 | 10 | 8 | 7 | 8 |
| | | | | | | | वाऱ्याची दिशा (अंश) | 112 | 122 | 180 | 189 | 202 |

## <u>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला</u>

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ११ व १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी काही ठिकाणी तर दिनांक १३, १४ व १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० कमी/तास), मेघगर्जना, वजांसह पावसाची शक्यता आ ण तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता असून दिनांक १२ व १३ ऑक्टोबर, २०२४ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० कमी/तास) , मेघगर्जना, वजांसह पावसाची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १६ ते २२ ऑक्टोबर, २०२४ |

| | | |
|---|---|---|
| अंदाज (ईआरएफएस) | | दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • जिल्ह्यात पावसाची शक्यता असल्याने पावसाचा अंदाज बघून पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची स्टिकरसह फवारणी करावी.<br>• काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. काढलेली पके पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने योग्यरीत्या ताडपत्रीने झाकून ठेवावीत.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• तसेच शेतकरी बंधूनी मेघगर्जना व वजेचा पूर्वानुमाना करीता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• रब्बी पकांच्या पेरणीसाठी जमीन तयार करून पेरणीस सुरवात करावी. |
| भात | दाणे भरण्याची अवस्था | ज्या ठिकाणी लागवड केलेली रोपे दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत तिथे १० सेमी पाण्याची पातळी ठेवावी. भात पकावर कडा करपा , पर्ण करपा, तप करी ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपरओक्झीक्लोरायिड २५ ग्राम प्रति १० ल . पाण्यात मसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. पाने गुंडाळणारी अळी, खोड कीड आ ण तुडतुडे याच्या नियंत्रणाकरिता ५ टक्के निंबोळी अर्काची पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| कापूस | वेचणी अवस्था | बोंडे पूर्ण उमललेल्या कापसाच्या वेचणीस सुरुवात करावी. सध्याच्या हवामानामुळे शेंदरी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा अंडी (ट्रायकोकार्ड) १.५ लक्ष/हेक्टर शेतात प्रसारण करावे. तसेच बोंड अळीच्या (रासायनिक) नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस ५० ईसी ३० मली कंवा स्पिनोसॅड ४५ एस.सी. ३.५ मली प्रति १० लटर पाण्यातून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. |
| सोयाबीन | पक्वता ते काढणी अवस्था | पक्व पकाची काढणी शेंगांचा रंग पवळट तांबूस झाल्यानंतर करून घ्यावी. पीक काढणीस उशीर झाल्यास शेंगा फुटण्यास सुरुवात होते. काडाचे छोटे छोटे ढीग करून प्रखर सूर्य प्रकाशात वाळवावे त्यानंतर मळणी करावी. तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने काढणी झालेल्या पकांची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. |
| तुर | फुलोरा अवस्था | फुलोरा अवस्थेमध्ये पकास आवश्यकतेप्रमाणे व उपलब्धतेनुसार पाणी द्यावे. कडीच्या प्रादुर्भावाचा अंदाज घेऊन प्रती हेक्टरी ५ या प्रमाणात कामगंध सापळे लावावेत. आवशक्यतेनुसार कोळपणी कंवा खुरपणी करावी त्यामुळे ज मनीतील ओलावा व अन्न्द्रव्यासाठी पकांची परस्परांशी स्पर्धा होणार नाही. शेतात पक्षांना बसण्यासाठी मचाण म्हणजेच इंग्रजी टी आकाराचे पक्षी थांबे ५० ते ६० प्रती हेक्टर उभारावेत. पकास फुलकळी येताना प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| मका | पक्वता ते काढणी अवस्था | फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी १५ ते २० दिवसापर्यंत करु नये. पक्व पकाची काढणी करून प्रखर सूर्य प्रकाशात वाळवावे. तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने काढणी झालेल्या पकांची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी. |
| हरभरा | पेरणी | हरभरा पकांची पेरणी करणेसाठी ज मनीची पुर्वमशागत करुन ज मन तयार करावी. बागायती हरभरा २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या दरम्यान पेरल्यास चांगले उत्पादन येते. ज मनीच्या पुरेश्या ओलाव्यावर व योग्य खोलीवर बीजप्र क्रया करून पेरणी करावी. |
| द्राक्षे | छाटणी अवस्था | ऑक्टोबर छाटणी वेळेवर करून छाटलेल्या कड्या व पाने बांधावर न टाकता योग्य वल्हेवाट लावावी. |

| | | |
|---|---|---|
| | | छाटणी नंतर वेलीच्या खोडांना कॉपरऑक्झीक्लोराईड ०.४ टक्के + गेरू ३ कलो प्रती १० ल. पाणी या प्रमाणे पेस्टिंग करावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जंताच्या व व वध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/टोचून घ्यावे. पावसाळ्यात जनावराना ओला चारा अति प्रमाणात दिल्यामुळे जनावरांचे पोट फुगते त्यामुळे ओला चारा योग्य प्रमाणात द्यावा. शेळ्याना गोचीड व पसवा यांपासून त्रास होऊ नये म्हणून डेल्टामे थ्रन हे रसायन असलेले (उदा.ब्युटॉक्स) द्रावण पशू वैद्यकाच्या सल्ल्याने गोठ्यात व शेळयांच्या अंगावर फवारावे. पाण्याच्या हौदांची निय मत स्वच्छता करून चुना लाऊन घ्यावे. |
| *टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/काळजी घ्यावी. | | |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादे शक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ.म. व., पुणे.

दि. : ११.१०.२०२४

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा

प्रमुख, कृ ष हवामानशास्त्र वभाग, कृ.म. व., पुणे